हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

मासिक

# नवस्नेह



ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ११ वे : अंक १
एप्रिल २०२५

स्वागतमूल्य
₹. 30/-



प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## सार्वजनिक बोडण कार्यक्रम





रविवार, दि. २ मार्च २०२५ रोजी कोल्हापूर चित्पावन संघात सार्वजनिक बोडण कार्यक्रम आयोजित केला होता. एकूण ९ बोडणे करण्यात आली आणि अत्यंत उत्साहाने बोडण कार्यक्रम संपन्न झाला.

## जागतिक महिला दिन विशेष कार्यक्रम




शनिवार, दि. ८ मार्च – जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून यावेळच्या भिशीचा नवीन उपक्रम होता 'महिलांच्या उत्तम आरोग्यासाठी योग व आहार'. सध्याच्या मॉडर्न युगात दोन गोष्टींकडे आपण नकळतपणे दुर्लक्ष करत आहोत, ते म्हणजे उत्तम पोषक आहार आणि योग्य व्यायाम. या विषयाबद्दल सर्वांना चांगली माहिती मिळावी, शंका निरसन व्हावे आणि आरोग्याबद्दल जागरुकता निर्माण व्हावी यासाठी श्री. महेश संजय आपटे (सर्टिफाईड ह्युमन परफॉर्मन्स न्युट्रिशिअनीस्ट) यांनी तर सौ. मृणालीनी महेश आपटे (सर्टिफाईड योगा प्रोटोकोल इन्स्ट्रक्टर) यांनी योगाभ्यास विषयक मार्गदर्शन केले.

आहार विषयक मार्गदर्शन करताना पुढील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली – तिशी नंतर महिलांच्या शरीरात कोणते बदल होतात, शरीरासाठी प्रमुख घटक कोणते आहेत आणि त्यांचा समावेश आपल्या आहारात कसा केला पाहिजे, तिशी नंतर स्त्रियांसाठी ५ महत्वाचे Nutrients कोणते आहेत ( प्रोटीन, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी , आयर्न आणि व्हिटॅमिन बी १२, फायबर व पाणी ) ह्याबाबत माहिती दिली आणि सध्याच्या स्मार्ट युगात जेवणाबाबतीत कोणत्या स्मार्ट सवयी आपण पाळायला हव्यात ह्याबद्दल चर्चा झाली जसं की प्रोटीन , फायबर्सचा समावेश आहारात करावा, Mindful Eating करावे ई.

योगाभ्यास आणि व्यायामाविषयक मार्गदर्शन करताना आत्ता सर्व वयोगटात व्यायामाची आणि खास करून योगाभ्यासाची गरज का आहे, योगाभ्यासाचे आपल्या शारीरिक आणि मानसिक स्तरावर कोणते फायदे होतात ते सविस्तरपणे सांगितले गेले. त्याचसोबत आपले संपूर्ण शरीर चपळ, सांधे निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येक अवयवाचा सूक्ष्मव्यायाम, खुर्चीवर बसून करता येण्यासारखी सोप्पी योगासने व व्यायाम प्रकार शिकवले गेले . त्याचसोबत आपल्या श्वासांवर नियंत्रण कसे ठेवावे आणि ते का महत्वाचे आहे आणि मेडिटेशन मुळे आपला ताण, टेन्शन कमी होऊन मन शांत राहण्यास कशी मदत होते ह्या विषयी सखोल मार्गदर्शन केले. सेशन संपल्यावर महिलांनी अतिशय उत्स्फूर्तरित्या आपल्या शंका विचारून त्यांचे निरसन करून घेतले.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष ११ वे : अंक १ : एप्रिल २०२५


- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

**अनुक्रम**


१) संपादकीय /४
२) आर्थिक साक्षरता परिसंवाद /५
३) का वाचावी ज्ञानेश्वरी? /७
४) ऋतू बरवा /९ – वैदेही जोशी
५) ज्ञानसूर्याची सावली /१२ – सौ. मंजुश्री गोखले
६) मुलांचे पान /१४
७) सोपानदेवांची अलौकिक सोपानदेवी /१६ – सौ. मंजुश्री गोखले
८) ब्राह्मण आणि सरकारी अनुदान /१७ – श्रीकांत शिंत्रे
९) विजयी पांडुरंग /२०
१०) चारामाचे एलियन्स /२१ – प्रशांत पोळ
११) हृदयस्थ भेट /२४
१२) वधूवर माहिती यादी /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१–२५४६२२५
०२३१–२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231–2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**‘नवस्नेह’ मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी ‘कोल्हापूर चित्पावन संघाचे’ खात्यांची माहिती पान क्र. ७ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

कसे आहात? या कडक उन्हानं अंगाची अगदी काहिली होत असताना कसे आहात हे विचारणं म्हणजे वेडेपणा आहे असं तुम्ही नक्की म्हणाला असाल ! पण या कडक उन्हातही थोडासा का होईना दिलासा द्यायला आपला 'नवस्नेह' आहे ना? म्हणून विचारलं. पण परवा पेपरला वाचलं की गेलेला फेब्रुवारी महिना हा सर्वात उष्ण महिना होता म्हणे आत्तापर्यंतच्या फेब्रुवारी महिन्यांमध्ये ! आणि हे पुढचे दोन महिनेही तसेच असणार आहेत म्हणे ! या वर्तमानपत्रवाल्यांना तर काही कळतच नाही. खून, मारामाऱ्या, अपघात याबद्दलच्या भरपूर बातम्या असताना ही असली बातमी कशाला द्यायची? उगीच नसतं टेन्शन !

मित्रांनो, पण नवस्नेह तुमचं टेन्शन घालवायला सिद्ध आहे हं ! या वेळच्या अंकात मार्च एप्रिलमध्ये लागणारी आर्थिक साक्षरता (अर्थात ती एरवीही लागते म्हणा) तुम्हाला सांगताहेत सीए. गौतम नाईक तर ज्ञानेश्वरी का वाचावी हाही लेख तुम्हाला आवडेल. चारामाचे एलियन्स हा एक माहितीपूर्ण लेख आणि एका गाण्याचं कौतुक हे लेखही तुम्हाला आवडतील. शिवाय आपली नेहमीची सदरे आहेतच. होळीसारखा उत्साह देणारा, पुरणपोळी देणारा सण ही नुकताच होऊन गेला. हे सण, उत्सव एकमेकांना भेटण्यासाठी, एकमेकांची ख्याली खुशाली विचारण्यासाठीच असतात. आणि तो भेटीचा आनंद अवर्णनीय असतो. कारण फोनवर नुसती विचारणा करणं कोरडं वाटतं. कारण

**कभी साथ बैठकर पूछो**

**तो बताऊँ दर्द क्या है।**

**अब यूं दूर से पूछोगे**

**तो खैरियत ही कहेंगे।**

तेव्हा मित्रांनो, आता परीक्षा संपल्या असतील, मग एकमेकांना भेटा. एकमेकांच्या घरी जा, ख्याली खुशाली विचारा ! तरच सणांचा आनंद लुटता येईल ! खरं ना?

ती सुनिता विल्यम्स परतणार बरं एकदाची! बरं वाटलं ते ऐकून. २८४ दिवस अंतराळात ती राहिली होती. कमाल आहे ना? पण अशा लोकांमुळेच तर इतिहास घडतात. तिचं या पृथ्वीवर हार्दिक स्वागत असो !

मित्रांनो, उन्हापासून स्वत:ला जपा ! मुला-लेकरांना जपा ! हे ऊन घातक आहे असं अभ्यासक सांगताहेत. तेव्हा सर्वांना सांभाळा, नवस्नेह वाचा आणि आनंदात रहा !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

निखिल गोखले

# चित्पावन संघातर्फे आर्थिक साक्षरता परिसंवाद

## नियमीत हिशेब, खर्चाच्या योग्य विभागणीने आर्थिक शिस्त - **सी.ए. गौतम नाईक**

दररोजच्या व्यवहारात ठेवलेला हिशेब त्याचबरोबर उत्पन्न- दैनंदीन खर्च याचा ताळमेळ साधत खर्चाची केलेली विभागणी, आणि टप्याटप्या ने केलेली गुंतवणूक यामुळे आपल्याला आर्थिक शिस्त लागून कुटुंब आर्थिक सक्षम बनते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाचा विचार करत आर्थिक निर्णय घ्यावेत. असे प्रतिपादन प्रसिद्ध सी. ए. गौतम नाईक यांनी केले.

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे शनिवारी मोतीबाग तालिम येथील संघ कार्यालयात जागतीक महिला दिनानिमीत्त आयोजीत आर्थिक साक्षरता या परिसंवादात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चित्पावन संघाचे अध्यक्ष मकरंद करंदीकर होते. तर प्रमुख उपस्थिती पंचगंगा बँकेचे माजी अध्यक्ष सी.ए विकास परांजपे, मंगलधामचे डॉ. उदय कुलकर्णी, दत्तात्रय आपटे, केदार जोशी यांची होती. स्वागत-प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी करून दिली. यावेळी उपस्थित महिलांचा सन्मान संचालिका संगिता आपटे व मेधा गोखले यांनी केला.

यावेळी सी. ए. नाईक यांनी एक्सेल सादरीकरणाच्या (एक्स चार्ट) माध्यमातून दररोजच्या जीवनातील हिशेबाचे महत्व, उत्पन्न-खर्च याच्यातील ताळमेळ, तसेच याद्वारे पुढील ४० वर्षातील आपली आर्थिक स्थिती कशी असेल याबाबत मार्गदर्शन केले. सी.ए. नाईक म्हणाले, ज्या प्रमाणे विज्ञान विषय समजण्यासाठी थिएरी व प्रॅक्टीकल या दोन्हींची गरज भासते त्यानुसार आर्थिक साक्षरता साधण्यासाठीही थिएरीरूपी तज्ञांच्या सल्याबरोबरच आपली दैनंदीन खर्च आणि उत्पन्नाची नियमीत नोंद गरजेची असते. मी नियमीत दररोजचा हिशेब लिहितो. तसेच माझ्या कुटुंबातील सदस्यांनाही (पत्नी-मुले) दररोजचा हिशेब लिहिण्याची सवय मी लावली आहे. त्यामुळे मला माझ्या उत्पन्न आणि खर्चाची परिपूर्ण माहिती उमगते. तसेच भविष्यातील खर्चाचा ताळमेळ किंवा अंदाज बांधून मला वाटचाल करणे सोपे जाते. आर्थिक नियोजन करताना उत्पन्न-खर्च गुंतवणूक हे महत्वाचे आधारस्तंभ विचारात घेणे गरजेचे आहे. मी मांडलेल्या एक्स चार्टमध्ये या आधारस्तंभाच्या मदतीने सध्याचे माझे वय, पुढील ४० वर्षातील मला येणारे खर्च, माझी शिल्लक, याचे ठोकताळे मी बांधू शकतो. मांडलेले हे आर्थिक गणीत अगदी तंतोतंत जरी नसले तरी भविष्यात जीवन सुखकर होण्यासाठी किती रक्कम आपल्याजवळ हवी याचा अंदाज बांधणे आपणास सोपे जाते. आपल्याकडे असलेली शिल्लक, मासीक उत्पन्न, त्यातून होणारा वार्षीक खर्च, उर्वरीत रक्कमेची केलेली गुंतवणूक ( एफडी, सेव्हींग खात्यात जमा, म्युचअल फंड, शेअर्स) यातून आपला आर्थिक आरसा स्पष्ट होतो. एक्स चार्टमुळे आपला अतिरीक्त खर्च आपण कसे टाळू शकतो, गुंतवणूक करताना कोणत्या पद्धतीने करावी जेणेकरून ती भविष्यात फायदेशीर ठरेल याचे नियोजन करणे सोप्पे जाते. लग्न-मुले-त्यांचा शैक्षणीक खर्च, आरोग्याचा खर्च, घर-वाहन हे भविष्यातील खर्च करताना आपल्यावर कोणत्याही प्रकारचे बर्डन येऊ नये यासाठी कोणत्या गोष्टीला प्रथम प्राधान्य द्यायचे याचे उत्तर एक्स चार्टद्वारे काढणे सहज शक्य आहे. सी.ए परांजपे म्हणाले, हिशेब लिहिण्यासाठी माणूस टाळाटाळ करतो, पण आर्थिक शिस्त पाळण्यासाठी हिशेब महत्वाचा आहे. आपल्या उत्पन्न-खर्चाची माहिती आपल्याकडे लिखीत स्वरुपात ठेवल्यामुळे आपले भविष्य सुकर होऊ शकते. मकरंद करंदीकर म्हणाले, चित्पावन संघ केवळ समाजाच्या विविध

उपक्रमांसाठीच कार्यरत नाही तर समाजातील तरुण पिढी सक्षम व आर्थिक दृष्या जागृक असावी यासाठी आम्ही आज हा परिसंवाद घेतला. चित्पावन संघाच्या माध्यमातून वर्षभर असे चांगले उपक्रम सुरूच राहणार आहेत. चित्पावन कोकणस्त ब्राह्मण समाजातील मुला-मुलींनीही शैक्षणीक कर्जासारख्या आमच्या योजनांचा लाभ घेऊन करियर घडवावे. प्रसाद भिडे म्हणाले, ज्याप्रमाणे आपले आरोग्य चांगले रहावे यासाठी आपण वर्षातून एकदा तपासणी करून घेतो त्याप्रमाणेच भविष्यातील स्वप्न साकार करण्यासाठी आर्थिक नियोजन कसे करावे याबाबत तज्ञांचे मार्गदर्शन जरूर घ्यावे. हा सेमीनार खासकरुन वयोगट २५ ते ३५ वयातील तरुण मुला-मुली तसेच नवदांपत्यांसाठी आम्ही ठेवला. आभार श्रीकांत लिमये यांनी मानले.

**आजपासून हे कराच :-** (१) आपला दैंनदीन हिशेब लिहा, (२) खर्चाची विभागणी करून त्याचा परिपूर्ण अभ्यास करा, (३) स्वताचा चार्ट बनवून उत्पन्न-खर्च याचा ताळमेळ साधत योग्य पद्धतीने गुंतवणूक करा (यामध्ये भविष्याचा विचार करून सेव्हिंग-एफडी, अन्य गुंतवणुकीचा रेशो ठरवा) (४) कोणताही मोठा आर्थिक निर्णय घेताना तज्ञांचा सल्ला जरूर घ्या.

**खर्चावर मर्यादा आवश्यक : -** कोणत्याही एका व्यक्तीस किंवा कुटुंबाला उत्पन्न वाढवणे शक्य नसेल तर त्यांनी आपल्या खर्चावर मर्यादा आणणे गरजेचे आहे. त्यासाठीचे आर्थिक नियोजन, निर्णय घेताना केलेला खर्च, किंवा घेतलेली वस्तू आपल्यासाठी फायदेशीर आहे की नाही हे एक्स चार्टद्वारे तपासून पहावे. दुचाकी-चारचाकी, नवीन फ्लॅट अशा गोष्टी घेताना घ्यावे लागणारे कर्ज, क्रेडीट कार्डावरील कर्ज, त्याचा व्याजदर, त्याचा देखभाल खर्च, आपले उत्पन्न, ठरावीक वयानंतर येणाऱ्या उत्पन्नाच्या मर्यादा याचा विचार प्रत्येक नागरीकाने करावा, असेही नाईक यांनी स्पष्ट केले.

**- निखिल गोखले**, मोबा : ९८९०३७१०७०

## आहेत कुठल्या भाषेत एवढी विशेषणं ?

लुसलुशीत- खुसखुशीत- भुसभुशीत- घसघशीत -
रसरशीत- ठसठशीत- कुरकुरीत- चुरचुरीत-
झणझणीत- सणसणीत- ढणढणीत- ठणठणीत-
दणदणीत- चुणचुणीत- टुणटुणीत- चमचमीत-
दमदमीत- खमखमीत- झगझगीत- झगमगीत-
खणखणीत- रखरखीत- चटमटीत/ चटपटीत-
खुटखुटीत- चरचरीत- गरगरीत- चकचकीत-
गुटगुटीत- सुटसुटीत- तुकतुकीत- बटबटीत-
पचपचीत- खरखरीत- खरमरीत- तरतरीत-
सरसरीत/सरबरीत- करकरीत - झिरझिरीत-
फडफडीत- शिडशिडीत मिळमिळीत- गिळगिळीत-
बुळबुळीत- झुळझुळीत- कुळकुळीत- तुळतुळीत-
जळजळीत- टळटळीत- ढळढळीत- डळमळीत-
गुळगुळीत- गुळमुळीत-

ह्या शब्दांना इंग्रजी, हिंदी अथवा कुठल्याही भाषेत प्रतिशब्द शोधून दाखववा... 'मॅक्सिन बर्नसन' ह्या एक अमेरिकन भाषातज्ज्ञ...! मराठी-बद्दल त्यांनी लिहिले आहे की, ही मराठी भाषा खूप छान आहे, पण जीव घाबरा करणारी आहे. मराठी भाषेत बाळबोध लिपीपासूनच हिंसेचे बाळकडू पाजले जाते..!! उदा... अक्षरांचे पोट फोडणे, पाय मोडणे; इतिहासात तर 'ध' चा 'मा' सुद्धा केला जातो..!! यांच्या सामाजिक व्यवहारातही उघड उघड हिंसाचार दिसतो - नाक दाबले, तर तोंड उघडणे.., अमक्याचे खापर तमक्याच्या माथी फोडणे, धारेवर धरणे, पाठीत खंजीर खुपसणे, बिन पाण्याने हजामत करणे, रक्त आटवणे, पाय ओढणे, पोटावर पाय देणे, कान उपटणे, डोक्यावर मिरे वाटणे इत्यादी, इत्यादी...

ही मराठी माणसे स्वत:बद्दलही हिंसक असतात... म्हणजे... झोपेतून उठल्यावर अंग मोडतात, बोटे मोडतात, घसाफोड करतात, तोंड फाटेस्तोवर बोलतात, घर डोक्यावर घेतात, डोक्यात राख घालतात आणि कांहीही खातात. मार खातात, बोलणी खातात, डोके खातात, वेळ खातात, लिहितांना काना-मात्रा वेलांट्या खाऊन टाकतात आणि कांही जण, तर पैसेही खातात...!

यांच्या शरीरशास्त्राच्या कल्पना तर काय विचित्र आहेत पाहा - यांचे हातपाय गळतात, काळजाचे पाणी होते, तोंडचे पाणी पळते !

आता सांगा, परकियांना ही भाषा येणार कशी..? पण माझ्यावर या भाषेने कृपा केली आणि मला ती चांगली यायला लागली...!! आणि माझा जीव भांड्यात पडला !!!

# का वाचावी श्री ज्ञानेश्वरी?

१) सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध कोपर्निकसने लावला.

माऊलीं ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरीमध्ये ७२५ वर्षापूर्वीच सूर्याचे भ्रमण हा भास आहे, हे वैज्ञानिक सत्य मांडली होते.

**उदय-अस्ताचे प्रमाणे।**
**जैसे न चालता सूर्याचे चालणे।**
**तैसे नैष्कर्म्यत्व जाणे। कर्मीचि असता।।**

सूर्य चालत नसून चालल्यासारखा दिसतो. सूर्याचे न चालता चालणे हा ज्ञानेश्वरीतील क्रांतीकारक शोध आहे.

२) मानवी जन्माची प्रक्रिया कसल्याही उपकरणाची मदत न घेता ज्ञानेश्वर महाराज जेव्हा सांगतात तेव्हा नामांकित डॉक्टरांनाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. माऊली लिहितात,

**शुक्र-शोणिताचा सांधा।**
**मिळता पाचांचा बांधा।**
**वायुतत्व दशधा। एकचि झाले।।**

शुक्र जंतू पुरुषाच्या वीर्यामध्ये असतात व शोणित पेशी स्त्रियांच्या बिजांड कोषात असतात. या शोणित पेशी अतिसूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय दिसत नाहीत.

सूक्ष्मदर्शक यंत्राचा शोध चारशे वर्षांतील आहे. परंतु माऊलींनी कसल्याही सूक्ष्मदर्शकाच्या मदती-शिवाय शोणित पेशींचा उल्लेख केला आहे. इथे त्यांच्यातील सर्वज्ञता दिसते.

३) पृथ्वी सपाट आहे की गोल या प्रश्नावर शास्त्रज्ञांत बराच काळ वाद चालला होता. पृथ्वी गोल आहे हा सिद्धांत आता जगन्मान्य झाला आहे.

माऊली ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरीमध्ये ७२५ वर्षापूर्वीच पृथ्वी गोल असल्याचे सांगितले.

**पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा।**
**तरी हा भूगोलचि काखे सुवावा।**
**तैसा विस्तारू माझा पाहावा।**
**तरी जाणावे माते।।**

भूगोल हा शब्दच ज्ञानेश्वरीने मराठीला दिला आहे. आणि पृथ्वी गोल असल्याचे निःसंदिग्ध सांगताना परमाणूचाही (Micro-Electron) स्पष्ट उल्लेख केलाय.

४) पाण्याच्या घर्षणातून जलविद्युत निर्माण होते. हा विजेचा शोधही शे दिडशे वर्षांपूर्वीचा आहे असे आपण मानतो.

परंतु माऊली ज्ञानोबाराय ७२५ वर्षांपूर्वीच सांगतात की, पाण्याचे जोरात घर्षण झाले की वीज तयार होते.

**तया उदकाचेनि आवेशे।**
**प्रगटले तेज लखलखीत दिसे।**
**मग तया विजेमाजी असे। सलील कायी।।**

५) सागराच्या पाण्याची वाफ होते, त्याचे ढग बनतात व त्याला थंड हवा लागली की पाऊस पडतो. ही पाऊस पडण्याची प्रक्रिया विज्ञानाने अलिकडे शोधून काढली आहे. परंतु माऊली ज्ञानोबाराय ज्ञानेश्वरीमध्ये लिहितात की, सूर्याच्या प्रखर उष्णतेने मी परमात्माच


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया,**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

पाणी शोषून घेतो व त्या वाफेचे ढगात रूपांतर करतो व इंद्रदेवतेच्या रूपाने पाऊस पाडतो. हे पावसाचे शास्त्रशुद्ध तंत्र सांगणारी ओवी अशी,

**मी सूर्याचेनि वेषे । तपे तै हे शोषे ।**
**पाठी इंद्र होवोनि वर्षे । मग पुढती भरे ।।**

६) विज्ञानाला सूर्यमालेतील ग्रहांचा शोध लागला आहे.

या विश्वाच्या पोकळीतील फक्त एकच सूर्यमाला मानवी बुद्धीला सापडली. अशा अनेक सूर्यमाला या पोकळीत अस्तित्वात आहेत. विश्वाला अनंत हे विशेषण लावले जाते. या विश्वात अनंत ब्रम्हांडे आहेत म्हणून भगवान अनंतकोटी ब्रहांडनायक ठरतात. परंतु माऊलीं ज्ञानोबारायांनी ७२५ वर्षापूर्वीच सूर्यमालेतील मंगळ या ग्रहाबद्दल लिहिले आहे. विज्ञानाने शोध लावण्यापूर्वीच माऊली मंगळाचे अस्तित्व सांगतात,

**ना तरी भौमा नाम मंगळ ।**
**रोहिणीते म्हणती जळ ।**
**तैसा सुखप्रवाद बरळ । विषयांचा ।।**

किंवा

**जिये मंगळाचिये अंकुरी ।**
**सवेचि अमंगळाची पडे पारी ।**

किंवा

**ग्रहांमध्ये इंगळ । तयाते म्हणति मंगळ ।**

इतकेच नव्हे, तर नक्षत्रांचेही उल्लेख आहेत. रोहिणीचा वरच्या ओवीत आलाय, तसेच मूळ नक्षत्र:

**परी जळो ते मूळ-नक्षत्री जैसे ।**

किंवा

स्वाती नक्षत्र:

**स्वातीचेनि पाणिये । होती जरी मोतिये ।**
**तरी अंगी सुंदराचिये । का शोभति तिये ।।**

कॅमेरा आणि पडद्यावर दिसणारा चित्रपट यांचे मूळही ज्ञानेश्वरीत सापडते.

**जेथ हे संसारचित्र उमटे । तो मनरूप पटु फाटे ।**
**जैसे सरोवर आटे । मग प्रतिमा नाही ।।**

अर्थात संकल्प-विकल्पांमुळे मनाचे चित्र उमटवणारे पटल किंवा पडदा फाटून जातो. चित्रपटासाठी पडदा आवश्यक आहेच किंवा सरोवरात पाणी असेल तरच आपली प्रतिमा त्यामध्ये उमटते. ते आटून गेले तर उमटत नाही.

या सर्व ओव्यांचा आशय लक्षात घेतला तर ज्ञानेश्वरीची वैज्ञानिकता ध्यानात येईल.

विज्ञानयुगात दिशाभूल झालेल्या युवक-युवतींनी ज्ञानेश्वरीची ही शास्त्रीयता लक्षात घेऊन मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्या-या संत वाङमयाच्या सहवासात यावे.

म्हणूनच वाचावी ज्ञानेश्वरी !

(आंतरजालावरून साभार)

## भावपूर्ण श्रद्धांजली !



कोल्हापूर चित्पावन संघाचे सभासद हितचिंतक देणगीदार कै. प्रभाकर हरी सोहनी यांच्या पत्नी पुष्पा प्रभाकर सोहनी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्याना कोल्हापूर चित्पावन संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

## भावपूर्ण श्रद्धांजली !



परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. गोपाळ विनायक गोरे यांच्या मातोश्री श्रीमती मंगल विनायक गोरे यांचे दिनांक ८ मार्च २०२५ रोजी दुःखद निधन झाले. कोल्हापूर चित्पावन संघ आणि चित्पावन परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!!

# ऋतू बरवा...

**काक: कृष्ण: पिक: कृष्ण:**

**को भेद: पिक - काकयो:**

**वसंत समये प्राप्ते**

**काक: काक: पिक: पिक:**

हिन्दू दिनदर्शिकेप्रमाणे भारतात माघ आणि फाल्गुन या महिन्यांत वसंत ऋतू असतो. वसंत ऋतूला ऋतूंचा राजा मानले जाते. नवचैतन्य, उत्कर्षाचा प्रतिक म्हणून वसंत ऋतू ओळखला जातो. वसंत ऋतूचे कृषी संस्कृतीशी एक विशेष नाते आहे.

वसंत ऋतू मधे झाडाला पालवी फुटते.

वसंत पंचमी पासून वसंतोत्सव सुरू होतो, हे देशभर मानले जाते.

वसंताचा उत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. तो ह्या दिवसापासून सुरू होतो. सतत सुन्दर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो.

यौवन हा जर आपल्या जीवनातील वसन्त असेल तर वसन्त हे सृष्टीचे यौवन आहे. महर्षी वाल्मीकींनी रामायणात वसंत ऋतूचे अतिशय सुन्दर व मनोहारी चित्रण केले आहे. भगवान श्रीकृष्णानेही गीतेत 'ऋतूनाम् कुसुमाकरः' असे म्हणून ऋतुराज वसंताची बिरुदावली गायली आहे.

वसंताचा उत्सव हे अमर आशावादाचे प्रतीक आहे.शिशिर ऋतूत वृक्षाची पाने गळून पडतात.

वसन्त म्हणजे आशा व सिद्धी ह्यांचा सुन्दर संगम !

वसंत पंचमी ही शिशिर ऋतूमध्ये येणारी माघ शुद्ध पंचमी होय. वसंत पंचमीलाच श्रीपंचमी किंवा ज्ञानपंचमी म्हणतात. हा दिवस सरस्वतीचा जन्मदिवस आहे. वसंत पंचमी ही कामदेवाच्या पूजेसाठीही ओळखली जात असे. सुफी परंपरेतील चिश्ती संप्रदायात हजरत निजामुद्दीन अवलियाचे शागीर्द मोहरीच्या पिवळ्या फुलांच्या रंगात बुडविलेली वस्त्रे नेसून हा सण साजरा करतात. मध्ययुगात या दिवशी 'सुवसंतक' नावाचा उत्सव होत असे.वसंत पंचमीचा कृषी संस्कृतीशी संबंध दिसून येतो. या दिवशी नवान्न इष्टी असा एक छोटा यज्ञ करतात. शेतात तयार झालेल्या नवीन पिकाच्या लोंब्या घरात आणून त्या देवाला अर्पण करतात.

पेशव्यांच्या काळात हा उत्सव महाराष्ट्रात उत्साहाने साजरा होत असे असा उल्लेख ब्रॉटन याने केला आहे. या दिवशी स्त्री-पुरुष आपल्या नातेवाइकांना फुलांचा अथवा हिरव्या देठाच्या धान्याच्या कणसांचा गुच्छ भेट म्हणून देत. डोक्यावरील पागोट्यात तो कणसाचा तुरा रोवत असत. याच दिवशी पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करण्याचीही पद्धत होती. फुले, फळे, मिठाई यांची देवाणघेवाण होत असे. वसंत ऋतूची सन्मानपूर्वक पूजा हा मुख्य भाग असे.

महाराष्ट्रात वसंत ऋतूचे औचित्य साधून, वैदिक ज्ञानाची परंपरा जोपासलेल्या ब्रह्मवृंद समुदायाचे पूजन केले जाते. याचवेळी कैरीची डाळ आणि पन्हे यांचा नैवेद्य देवाला अर्पण केला जातो आणि सर्वांना प्रसाद वाटप केले जाते.

वसंत ऋतू हा नूतनीकरण, वाढ आणि नवीन सुरुवातीचा हंगाम आहे. ही अशी वेळ आहे जेव्हा जग हिवाळ्याच्या झोपेतून जागे होते आणि निसर्ग रंग, आवाज आणि ऊर्जेने जिवंत होतो. फुलांच्या पहिल्या मोहोरापासून स्थलांतरित पक्ष्यांच्या परत येण्यापर्यंत, वसंत ऋतू हा सौंदर्य आणि आश्चर्याचा हंगाम आहे.

निसर्ग नेहमीच सुंदर असतो, पण या काळात - विशेषत: वसंत ऋतूच्या चाहुलीनंतर त्याची अनेक रंगीत आणि लक्षवेधी रूपे बघायला मिळतात. पळस, पांगारा, सावरी, शाल्मली या काळात फुलून येतात. केशरी, पिवळा, गुलाबी, लाल अशा अनेक

रंगछटांनी जणू निसर्गाची रंगपंचमीच सुरू होते.

सगळी किमया घडवून आणणारा ऋतू म्हणजे वसंत! वसंत म्हणजे शिशिरातील पानगळतीनंतर मोहोर, नवपालवी देणारा - त्या अर्थाने चैतन्य, नवजीवन आणणारा ऋतू, म्हणूनच तो सर्वकालीन सर्वप्रिय असावा. भारतासारख्या अतिविशाल देशात, नैसर्गिक वैविध्यामुळे, निरनिराळ्या दिनदर्शिकांनुसार वसंत ऋतूच्या कालमानात थोडा फरक दिसतो. काही ठिकाणी माघ-फाल्गुन, काही ठिकाणी फाल्गुन-चैत्र, तर काही ठिकाणी चैत्र-वैशाख या महिन्यांमध्ये वसंत मानला जातो. असे असले, तरीही सर्वसाधारणपणे उत्तरायण सुरू झाल्यावर थोड्याच दिवसांनंतर, माघ महिन्या-पासूनच वसंताची चाहूल लागायला लागते.

वसंत.. नावीन्याचा, चैतन्याचा, यौवनाचा ऋतू! साहजिकच या काळात भारतभर अनेक उत्सव साजरे केले जातात आणि ही परंपरा अगदी जुन्या काळापासूनची आहे. प्राचीन काळात मानव निसर्गाच्या अधिक सान्निध्यात होता व सभोवतालच्या निसर्गक्रमाप्रमाणे, ऋतुचक्राप्रमाणे त्याचे एकूणच सगळे व्यवहार चालत असल्याने, सर्व प्रकारची व्रते, सण, उत्सव या अनुषंगानेच आखण्यात आलेले दिसतात. वसंतोत्सव, मदनोत्सव, होळी, रंगपंचमी असे कितीतरी उत्सव या दिवसांमध्ये येतात.

वसंत ऋतू म्हटलं की मनात अनेक गोष्टी रुंजी घालू लागतात. वसंत ऋतू म्हणजे नववर्षाची सुरुवात, उभारलेल्या गुढ्या, रामनवमी, गीतरामायणाचे सूर, हनुमान जयंती, अक्षय तृतीया, वसंत व्याख्यानमाला, पांढरा चाफा, मोगऱ्याचा घमघमाट, लालचुटुक गुलमोहोर, पिवळाजर्द बहावा, चैत्रगौरीची पूजा, रांगोळी, आंब्याची डाळ, कैरीचं पन्हं, ओल्या हरभऱ्याची ओटी, आंबा आणि फणसाचे विविध पदार्थ, वाळवणं, आईस्क्रीम, सरबत, उसाचा रस, गुलकंद, परीक्षा, सुट्ट्या, सहली, लग्नसराई इत्यादी इत्यादी इत्यादी आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे कोकीळ कूजन !

निसर्ग, हे ऋतुचक्र आपल्याला खूप शिकवत असतो. शिशिरातल्या पानगळीतही तग धरून राहण्याचं बळ देणारा वसंत ऋतू. नवनिर्मितीची स्वप्नं दाखवणारा वसंत ऋतू... आणि म्हणूनच प्रत्येक ऋतूत आपल्या मनात हा वसंत ऋतू जपूया..

ऋतू बदलला की त्याप्रमाणे हवेत बदल होतात. त्याप्रमाणे शरीरातही बदल होतात. म्हणून अशा काळात आपल्या आरोग्याची (Health) काळजी घेणे गरजेचे असते. ऋतुमानानुसार आहार आणि आरोग्य कसे जपावे हे आयुर्वेदात सांगितले आहे. सध्या वसंत ऋतू सुरू आहे. या काळात हवामानातील बदलामुळे सर्दी, खोकला, पचनशक्तीत समस्या निर्माण होतात. आयुर्वेदानुसार या काळात कफ दोष वाढू लागतो. तसेच या ऋतूत अग्नि तत्व कमी होऊ लागते आणि अपचन होण्याची समस्या वाढते.

• या ऋतूत कारलं, पडवळ अश्या कडू रस असलेल्या पदार्थांचा ज्यूस किंवा सूप पिणे चांगले.

• जड अन्न खाण्यापेक्षा पचायला हलके असलेले पदार्थ खा. तुम्ही मूगडाळ, खिचडी, दलिया असे पदार्थ खाऊ शकता.

• दूधी, कोबी, गाजर, पालक, मटार यासारख्या पौष्टीक भाज्यांचा आहारात समावेश करायला हवा.

या काळात मध आणि गरम पाणी एकत्र प्यायल्यास कफदोष कमी होईल तसेच तुम्हाला सर्दी- खोकला होणार नाही.

वसंत ऋतू म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसांची सुरुवात, वसंत ऋतूमध्ये भरपूर प्रमाणात जीवनसत्त्वे असलेली फळे आणि भाज्या हरवलेली चमक, मृत आणि कोरडी त्वचा भरून काढण्यासाठी, वाढविण्यासाठी आणि सुशोभित करण्यासाठी जादूने काम करतात.

वसंत ऋतू खूप आवश्यक असलेल्या व्हिटॅमिन डीचा स्त्रोत, आणतो. मानवी शरीर

दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी, हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी, प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी आणि स्नायूंची दुरुस्ती करण्यासाठी व्हिटॅमिन डीचे नैसर्गिक स्रोतअत्यंत महत्त्वाचे आहेत.

भारतातील वसंत ऋतु हा सांस्कृतिकदृष्ट्या मार्च आणि एप्रिल महिन्यात असतो.

वसंत हा आयुर्वेदातील वसंत  जो नूतनीकरण आणि कायाकल्पाचा काळ मानला जातो. या ऋतूमध्ये अभ्यंग करणे विशेषतः फायदेशीर आहे कारण ते शरीरातील ऊर्जा संतुलित करण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि डिटॉक्सिफिकेशनला प्रोत्साहन देण्यास मदत करते.

सगळीकडे फुललेली फुले. वैभवशाली रंग. तेजस्वी सूर्यप्रकाश. सूर्याने उत्तर गोलार्धात चढण्यास सुरुवात केल्याने उष्ण तापमान, किमान हंगामाच्या सुरुवातीच्या काळात रात्री अजूनही किंचित थंड असते. एकूणच, हा वर्षातील अधिक मध्यम आणि आनंददायी काळ आहे.

वसंत ऋतू या विषयावर अनेक चित्रपट बनवण्यात आले आहेत. वसंत ऋतू हा नवीन सुरुवातीचा काळ असल्यामुळे, अनेक चित्रपटांमध्ये या ऋतूचे चित्रण करण्यात आले आहे

अनेक संस्कृत व प्राकृत नाटके, कथा, काव्ये यांतून वसंतोत्सव, मदनोत्सव यांची वर्णने वाचायला मिळतात व तेव्हाच्या समाजात हे उत्सव कशा प्रकारे साजरे केले जात असत याची माहिती समजते.

वसंत ऋतूच्या सौंदर्याने आणि मोहकतेने नाटक अन्  चित्रपटानांही भूरळ घातली आहे. अनेक नादमधुर.. सुश्राव्य संगीताने भारलेली वसंत ऋतूचे वर्णन असलेली गाणी आपण ऐकून तृप्त होतो..

आयुष्यात वसंताचा काळ आला की आयुष्य ही फुलून... बहरून... येते हे निसर्गानेच तर शिकवलंय...

– **वैदेही जोशी,** मोबा. ९५४५६३५४६५


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**रविवार दि. 6 पुष्य नक्षत्र**
**बुधवार, दि. 30 अक्षय्यतृतिया**


**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**


**दिनविशेष (एप्रिल २०२५) विश्वावसूनाम संवत्सरे**
**फाल्गुन-चैत्र १९४६**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे। साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**




**बुधवार दि. २ :** ज्योतिर्लिंग षष्ठी यात्रा, **गुरुवार दि. ३ :** छ.शिवाजी महाराज पुण्यदिन, **रविवार दि. ६ :** श्रीरामनवमी, **गुरुवार दि. १० :** महावीर जयंती, **शुकवार दि. ११ :** म.फुले जन्मदिन, **शनिवार दि. १२ :** हनुमान जयंती, ज्योतिर्लिंग यात्रा, **रविवार दि. १३ :** श्रीमहालक्ष्मी रथोत्सव, **मंगळवार दि. १४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, **बुधवार दि. १६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.५२), **शुक्रवार दि. १८ :** गुडफ्रायडे, **रविवार दि. २० :** ईस्टर संडे, **मंगळवार दि. २२ :** जागतिक वसुंधरा दिन, **शनिवार दि. २६ :** श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी, **मंगळवार दि. २९ :** शिवजयंती (परंपरेने), श्री परशुराम जयंती, **बुधवार दि. ३० :** महात्मा बसवेश्वर जयंती, अक्षय्यतृतीया, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती.

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक चाळिसावा)

''अगं, या इवल्याशा सोपानानं ओवीबद्ध शब्दरचना केली त्याचा आणि आता याला शिकवणं, समजावणं मला सोपं जाईल याचा ! सोपाना, आता उद्यापासूनच आपण वेदाच्या अभ्यासाला सुरुवात करू या. सोपाना, मी धन्य झालो ! धन्य धन्य झालो ! माझे दोन्ही शिष्य लोकोत्तर ठरणार, युगोत्तर ठरणार याचा विश्वास मला मिळाला!'' निवृत्तीदादा भरभरून बोलत होता. त्याला झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावरून, डोळ्यांतून, देहबोलीतून ओसंडून वाहत होता. ज्ञानेशाचं मन आनंदानं फुलून आलं होतं. 'आज आई-बाबा हवे होते' क्षणभर त्याच्या मनात आलं; पण ते नक्कीच कुठूनतरी पाहत असतील, याचाही त्याला विश्वास वाटला आणि आई-बाबांच्या आठवणीने क्षणभर व्याकूळलेलं त्याचं मन पुन्हा प्रसन्न झालं. दादाला झालेला आनंद, त्यानं दिलेली शबासकी, त्याला वाटलेली धन्यता आणि वेद शिकवण्याचं त्याचं वचन हे सगळं-सगळं सोपानाला नवी संजीवनी, नवी प्रेरणा, नवी स्फूर्ती देऊन गेलं व काहीसा लाजलेला, संकोचलेला, घुसमटलेला सोपान मोकळा झाला. उमलला, खुलला. तोच निवृत्तीदादानं पुन्हा विचारलं, ''सोपाना, उत्तर दिलं नाहीस?'' आता सोपान सावरला. दादाच्या प्रेमळ स्पर्शानं त्याचा आत्मविश्वास दुणावला. ''दादा, गेले काही दिवस ही शारदेची कृपा माझ्यावर झाली आहे. तुमच्या आणि ज्ञानादादाच्या मार्गदर्शनाखाली मला माझी प्रतिभा आणखी विकसित करायची आहे. येईल ना मला?'' सोपानाचं बोलण्यातलं मार्दव, आर्जवी लाघव, नम्रता, तरीही आत्मविश्वासानं ओसंडून वाहणारा स्वर, 'खरंच हा आपला लहानगा सोपान आता खरोखरच मोठा झालाय !' निवृत्ती-ज्ञानेशा दोघांच्या मनात एकच विचार एकदम आला. दोघांची नजरानजर झाली, आणि दोघांनी एकमेकांच्या मनातला विचार वाचला. दोघांच्या चेहऱ्यावर उत्फुल्ल हसू उमटलं. ''निश्चितच सोपाना ! तथास्तु ! तथास्तु !'' दोघंही एकदम बोलले आणि कसा कुणास ठाऊक सोपान पुन्हा लहान झाला. दोघांनी 'तथास्तु' म्हटल्यावर आनंदानं त्यानं मुक्तीचा हात धरला आणि तिच्यासह तो गरगर फिरला. मुक्ताही आनंदात सामील होतीच. त्या झोपडीत भर माध्यान्हीला हास्याचं कारंजं फुललं! आनंदाला उधाण आलं !! प्रसन्नेतेचं चांदणं अवतरलं !!!

काही वेळ असाच गेला. तोच बाहेरून हाक ऐकू आली. ''निवृत्ती ऽ ऽ! ज्ञानेशा ऽ ऽ ! आहात काय रे घरात?'' विनायकबुवा आले होते. ''या भूदेव ! आपले स्वागत आहे !'' म्हणत निवृत्ती-ज्ञानेश्वर पुढे झाले. विनायकबुवा अंगणातच उभे राहिले. तिघे भावंडे अंगणात गेली. तिघांनीही विनायकबुवांना नमस्कार केला. ''ज्ञानेशा, का निरोप धाडला होतास?'' त्यांनी विचारलं, ''भूदेव, आपण इथं येण्याचे कष्ट का घेतलेत? मी आलो असतो. मी फक्त मला भेट घ्यायची आहे, असा निरोप पाठवला होता. क्षमा करा. आपल्याला इथं येण्याचे कष्ट पडले !'' ज्ञानेशानं समर्थन कलं. ''नाही ज्ञानेशा ! मी इथून निघालोच होतो. वाटेत तुमची झोपडी बघितल्यावर निरोपाची आठवण झाली. म्हणून डोकावलो !'' विनायकबुवांनी सांगितलं आणि विचारलं, ''बोला बाळांनो, काय काम होतं?'' त्यांचा प्रश्न ऐकून मात्र तिथलं

वातावरण बदललं. तिघंही गंभीर झाली. निवृत्तीनं उत्तर दिलं, ''भूदेव, आपली अनुज्ञा असेल, तर काही विचार मांडीन म्हणतो !'' विनायकबुवा म्हणाले, ''अरे बोल बाळा, नि:संकोच बोल !'' त्यांचे अभय मिळताच निवृत्तीनं विषयालाच हात घातला. ''भूदेव, आमच्यावरचं ग्रामण्य उठावं, समाजानं आमचा स्वीकार करावा आणि आम्हा तिघा भावंडांना आपल्यात सामावून घेऊन आमच्या उपनयन संस्काराला अनुमती मिळावी यासाठी, केवळ याचसाठी धर्मसभेनं दिलेली अपकर्माची शिक्षा स्वीकारून आमच्या आई-बाबांनी प्राणत्याग केला. म्हणजे धर्ममार्तंडांच्या मते त्यांनी केलेल्या अधर्माचं प्रायश्चित्त त्यांनी घेतलं आहे. मग अजून आमच्यावर ग्रामण्य का? आमच्यावरचं ग्रामण्य उठवावं, आम्हाला समाजात सामावून घ्यावं व आमच्या मौजीबंधनाची अनुमती धर्ममार्तंडांनी द्यावी; यासाठी आम्ही चौघं जण विज्ञप्ती पत्र घेऊन धर्मसभेत जावं, असा विचार चालला आहे. आमच्यासवे आपण यावं, तरच आम्हाला तिथं प्रवेश मिळेल. ही विनंती करण्यासाठी आम्ही आपल्याकडे येणार होतो. आपण आमच्यासवे असलात, तरच आम्हाला धर्मपीठ प्रमुखांपर्यंत पोहोचता येईल. आमचा मानस त्यांना सांगता येईल. आमचं गाऱ्हाणं मांडता येईल. तेव्हा भूदेव, आपण याल ना आम्हा भावंडांसोबत?'' निवृत्तीनं विचारलं.

विनायकबुवांनी संमतिदर्शक मान हलवली. तोच पाठीमागून कावेरीअक्कांचा आवाज आला, ''न यायला काय झालं? येईल तो! हे पुण्याईचं काम आहे. येईल हं तो !'' असं म्हणत लगबगीनं कावेरीअक्का पुढे झाल्या आणि मुक्तीला म्हणाल्या, ''मुक्ते, हे घे. थोड्या जोंधळ्याच्या लाह्या आणल्या आहेत. दामू गुरवानं यलगर दिलं होतं, पायली दोन पायली. मग कालच उमलं घातलं होतं. भल्या पहाटे उठून लाह्या फोडल्या. म्हटलं पोरांना द्याव्यात !'' कावेरीअक्काच्या आवाजातून माया ओसंडत होती. त्यांनी चांगल्या दोन-तीन शेर लाह्या आणल्या होत्या. पोरांच्या चेहऱ्यावर आनंद उमटला होता. मुक्ता पळत आत गेली. उतरंडीवरचं एक रिकामं गाडगं घेऊन बाहेर आली. कावेरीअक्कांनी फडक्यातून बांधून आणलेल्या लाह्या तिनं त्यात ओतून घेतल्या. पोरांच्या चेहऱ्यावरून हात फिरवून, ''येईल हो विनायक तुमच्याबरोबर !'' असं आश्वासन देऊन त्या गेल्या. विनायकबुवा म्हणाले, ''निवृत्ती-ज्ञानेशा, आपण आधी विज्ञप्ती पत्र तयार करू. उद्या पैठणाहून कोणी धर्ममार्तंड येणार आहेत. तेव्हा आपण उदाईक दुसऱ्या प्रहरी धर्मसभेत जाऊ. मी तेवढा काशी-विश्वेश्वराला अभिषेक घालून येतो. मग आपण त्या संबंधांत बोलू !'' निवृत्ती ज्ञानेशानं होकारार्थी मान हलवली, तसे विनायकबुवा गेले; पण त्यांचं बोलणं ऐकून निवृत्ती-ज्ञानेश्वर, सोपान तिघांनाही बरं वाटलं. तोच निवृत्तीदादा म्हणाला, ''चला, आपण पानाचा मजकूर तयार करू या !'' ज्ञानेश्वर म्हणाला, ''दादा, मजकूर असा तयार करू या... असा तयार करू या की... !''

''तो मजकूर वाचूनच धर्मपीठानं आपल्यावरचं ग्रामण्य मागं घ्यावं ! होय ना?'' सोपानानं ज्ञानेशाला मध्येच थांबवत विचारलं. ''अगदी योग्य बोललास सोपाना ! निवृत्तीदादा, आपण अगदी योग्य वेळी योग्य मार्गानं धर्मसभेत जातो आहोत ना?'' ज्ञानेशानं विचारलं. त्याच्या स्वरात उत्साह होता. त्याला त्याच उत्हासानं निवृत्तीनं दुजोरा दिला. मुक्तानं धावत जाऊन मसीपत्र (दौत) आणि लेखणी आणली. कर्गजाची गुंडाळी (कागद) घेऊन आली आणि तिघंही भाऊ विज्ञप्ती पत्र तयार करण्यात गुंतले.

(क्रमश:)

**- सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

# मुलांचे पान




## » चित्र रंगवा




## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा





# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ७ : ज्ञानयोग**

श्री भगवानुवाच ।

**श्रीकृष्ण म्हणती अर्जुना अवधारी । मन माझे ठायी ठेउनी योग करी । तुझे संशय नाशती जयापरी । ते सांगेन ऐक आता ।।**

प्रीतीने आसरा माझा घेउनी योग साधित ।
जाणशील कसे ऐक समग्र मज निश्चित ।।१।।

**ज्ञानविज्ञानसहित । तुज सांगेन समस्त ।**
**जे जाणितल्या निश्चित । जाणणें कांहीच नुरे ।।**

विज्ञानासह ते ज्ञान संपूर्ण तुज सांगतो ।
जे जाणूनि पुढे येथे जाणावेसे न राहते ।।२।।

**मनुष्याचिया सहस्त्रामध्यें । सिद्धिते पावे एखादे ।**
**ऐसिया सिद्धा सहस्त्रामध्यें । मज जाणे एखादा ।।**

लक्षावधींत एखादा मोक्षार्थ झटतो कधी ।
झटणाऱ्यात एखादा तत्त्वतां जाणतो मज ।।३।।

**पंचभूते आणि षट । बुद्धि आणि अहंकार आठ ।**
**ऐसी हे माझी प्रकृति जुनाट । असे वेगळाली ।।**

पृथ्वी आप तसे तेज वायु आकाश पांचवें ।
मन बुद्धि अहंकार अशी प्रकृति अष्ट-धा ।।४।।

**इहींहून आणिक असे प्रकृति । जे जीव भूतातें महाबाहो धरिती । उत्पत्ति प्रळय स्थिति । ते तिये माजी ।।**

ही झाली अपरा माझी दुसरी जाण ती परा
जीव-रूपे जिने सारे जग हे धरिले असे ।।५।।

**सर्व भूताचियोधनि । वर्ते तयातें अधिष्ठुनी । ते जाली मजपासूनी । उत्पत्ति प्रळय ती पात्सुनि जाणा ।।**

ह्या दोहींपासुनी भूते सगळी जाण निर्मिली ।
साऱ्या जगात तद्-द्वारा मूळ मी आणि शेवट।।६।।

**म्हणोनि मज परते कांही । अर्जुना आणिक उरले नाही । मी अवघीयाच्या ठायी । जैसा सुत्री मणी पटीं तंतु ।।**

दुसरें तत्त्व नाही चि कांही माझ्या पलीकडे ।
ओविले सर्व माझ्यांत जसे धाग्यामधे मणि ।।७।।

**मी सर्व रसाचि गोडी । अर्जुना चंद्रसूर्य तेज ते माझी प्रौढी । पुरुषी पुरुषत्व वेदबीज गाढी । ॐ कार उच्चार तो आण मी ।।**

पाण्यांत रस मी झालो चंद्र-सूर्यी प्रकाश मी ।
ॐ वेदी शब्द आकाशी पुरुषी पुरुषार्थ मी ।।८।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग ३**

१९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. आपण लोकशाही पद्धत स्वीकारली. शासन लोकाभिमुख होण्यासाठी भाषावार प्रांतरचना केली. प्रत्येक प्रांताचे, एक राज्य सरकार आणि सगळ्या देशाचे मिळून एक केंद्र सरकार अशी शासन रचना आली. दर पाच वर्षांनी निवडणुका होऊन लोक आपल्या पसंतीचे सरकार राज्यात आणि केंद्रामध्ये निवडून द्यायला लागले. प्रत्येक सरकार आपापल्या पक्षाच्या धोरणाप्रमाणे राज्यकारभार करू लागले.

पण येथे हे ध्यानात घ्यायला हवे की सरकार म्हणजे मंत्रीमंडळ फक्त ध्येयधोरणे ठरवते आणि त्यांची कार्यवाही शासन यंत्रणा करते. निवडणुकी-नंतर जरी मंत्रीमंडळ बदलले तरी, शासन यंत्रणा तीच असते. अर्थात शासन यंत्रणा भक्कम असावी लागते.

ब्रिटीश लोकांनी या शासन यंत्रणेचा पाया घातला आणि या शासनाच्या उच्चतम पातळीवर काम करण्यासाठी इंडियन सिव्हिल सर्व्हिस ही श्रेणी निर्माण केली. या श्रेणीत पास झालेले अधिकारी अत्यंत हुशार, कार्यक्षम असत. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या धर्तीवर इंडियन ॲडमिनि-स्ट्रेटीव्ह सर्व्हिस ही श्रेणी निर्माण केली. आणि याच्यामध्ये निवड करण्याकरता केंद्रीय लोकसेवा आयोग स्थापन केला. म्हणजेच UPSC, राज्य स्तरावर उच्चतम अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी राज्यस्तरावर पण एक वेगळा आयोग स्थापन केला. आपल्या महाराष्ट्रात एम.पी.एस.सी.

वरील दोन्ही श्रेणी अतिशय उच्चतम दर्जाच्या असून २०२४ करता UPSC च्या फक्त १३५६ रिक्त जागा होत्या आणि MPSC च्या २७४ परंतु या परीक्षांना लाखो मुले बसतात. यावरूनच या परीक्षेमधून निवड होणे किती कठीण आहे हे लक्षात येईल.

पूर्व परीक्षा, त्यातूनच छाननी करून मुख्य परीक्षेकरता निवड आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यास शेवटी मुलाखत आणि मग अंतिम निवड अशी प्रक्रिया असते.

UPSC आणि MPSC च्या परीक्षेच्या आर्थिक साहाय्याकरता आर्थिकदृष्ट्या दुर्बल ब्राह्मणांकरता 'अमृत' खालील योजना राबवत आहे.

UPSC च्या मुख्य परीक्षा व मुलाखतीच्या तयारीसाठी अर्थसाहाय्य.

योजनेचा उद्देश : अमृतच्या लक्षीत गटातील विद्यार्थी, युवक, युवती यांना संघ लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन केंद्र शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाराच्या पदावर पदस्थापना मिळण्यास व त्याचा देशाचा प्रशासनातील सहभाग वाढविण्यास प्रोत्साहन देणे.

योजनेचा लक्ष गट : खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग/संस्था/महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षीत गटातील विद्यार्थी, युवक, युवती जे संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) विविध विभागांच्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्वपरीक्षा उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेसाठी पात्र झालेले आहेत असे उमेदवार तसेच, जे मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र झालेले आहेत असे उमेदवार.

या योजनेत संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) खालील पदांसाठी परीक्षांचा अंतर्भाव आहे.

१) संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा.

२) संघ लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवा.

३) संघ लोकसेवा आयोगाच्या वनसेवा.

**लाभार्थी निवड निकष :-**

१) अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

२) मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य योजनेकरिता अर्ज करताना अर्जदाराने संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) वरील नमूद केलेल्या परीक्षांच्या प्रवेशपत्राची व पूर्वपरीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निकालाची स्वस्वाक्षारीत प्रत सादर करावी.

३) मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य योजनेकरिता अर्ज करताना अर्जदाराने संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) वरील नमूद केलेल्या परीक्षांच्या प्रवेशपत्राची व मुख्य परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निकालाची स्वस्वाक्षरीत प्रत सादर करावी.

४) अर्जदाराच्या वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्याचा तपशील - बँकेचे नाव, शाखा, खाते प्रकार, खाते क्रमांक, IFSC

**अर्ज करण्याची पद्धत :-**

योजनेच्या लाभासाठी इच्छुक अर्जदारांनी विहित मुदतीत अमृत संस्थेच्या संकेतस्थळावर www.mahaamrut.org.in ऑनलाईन अर्ज करावेत. त्यासोबत आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज अपलोड करावेत. तसेच, अर्जाची हार्ड कॉपी स्वाक्षरीत करून त्यासोबत आवश्यक सर्व दस्तऐवज/कागदपत्रे स्वयं साक्षांकित करून अमृत कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे.

**लाभाचे स्वरूप :-**

१) संघ लोकसेवा आयोगाच्या राजपत्रीत सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य अनुज्ञेय राहील.

२) संघ लोकसेवा आयोगाच्या राजपत्रीत सेवा मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी रक्कम रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य.

MPSC च्या मुख्य परीक्षा व मुलाखतीच्या तयारीसाठी अर्थसाहाय्य

**योजनेचा उद्देश :-**

अमृतच्या लक्षीत गटातील विद्यार्थी, युवक, युवती यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होवून राज्य शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाराच्या पदावर पदस्थापना मिळण्यास व त्यांचा प्रशासनातील सहभाग वाढविण्यास प्रोत्साहन देणे.

**योजनेचा लक्षगट :-**

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग/संस्था/महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षीत गटातील विद्यार्थी, युवक, युवती जे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विविध विभागांच्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्वपरीक्षा उत्तीर्ण होवून मुख्य परीक्षेसाठी पात्र झालेले आहेत असे उमेदवार तसेच जे मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र झालेले आहेत असे उमेदवार. या योजनेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) खालील परीक्षांचा अंतर्भाव आहे.

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र नागरी सेवा (राजपत्रीत पदे) - (१) राज्य सेवा, (२) निरीक्षक वैधमापन शास्त्र सेवा, (३) अन्न व औषध प्रशासकीय सेवा.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध तांत्रिक

सेवा (राजपत्रीत पदे) - (१) महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, (२) महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, (३) महाराष्ट्र विद्युत आभियांत्रिकी सेवा, (४) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, (५) महाराष्ट्र वन सेवा, (६) महाराष्ट्र कृषी सेवा.

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग).

४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित (गट-ब) - (१) सहाय्यक कक्ष अधिकारी, (२) पोलीस उपनिरीक्षक, (३) राज्य कर निरीक्षक, (४) मुद्रांक निरीक्षक.

**लाभार्थी निवड निकष :-**

१) अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य योजनेकरिता अर्ज करताना अर्जदाराने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) वरील नमूद केलेल्या परीक्षांच्या प्रवेशपत्राची व पूर्वपरीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निकालाची स्वस्वाक्षारीत प्रत सादर करावी.

३) मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य योजनेकरिता अर्ज करताना अर्जदाराने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) वरील नमूद केलेल्या परीक्षांच्या प्रवेशपत्राची व मुख्य परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या निकालाची स्वस्वाक्षरीत प्रत सादर करावी.

४) अर्जदाराच्या वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्याचा तपशील - बँकेचे नाव, शाखा, खाते प्रकार, खाते क्रमांक, IFSC कोड

**अर्ज करण्याची पद्धत :-**

योजनेच्या लाभासाठी इच्छुक अर्जदारांनी विहित मुदतीत अमृत संस्थेच्या संकेतस्थळावर www.mahaamrut.org.in ऑनलाईन अर्ज करावेत. त्यासोबत आवश्यक कागदपत्र/दस्तऐवज अपलोड करावेत. तसेच अर्जाची हार्ड कॉपी स्वाक्षरीत करून त्यासोबत आवश्यक सर्व दस्तऐवज/कागदपत्रे स्वयं साक्षांकित करून अमृत कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे.

**लाभाचे स्वरूप :-**

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर नमूद केलेल्या राजपत्रीत सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रक्कम रु. १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य अनुज्ञेय राहील.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर नमूद केलेल्या अराजपत्रीत सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य अनुज्ञेय राहील.

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर नमूद केलेल्या अपराजपत्रीत सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य अनुज्ञेय राहील.

४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर नमूद केलेल्या अपराजपत्रीत सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रक्कम रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रती लाभार्थी प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य अनुज्ञेय राहील.

**- श्रीकांत शिंत्रे**

मोबा. ९६१९१९६७०५

# विजयी पांडुरंग

पैठण गावात जे नाथांचं मंदिर आहे, त्यांच्या देवघरात सर्वात वर तुळशीची माळ घातलेली पांडुरंगाची मूर्ती आहे ती सदैव फुल, वस्त्र, अलंकाराने झाकलेली असते त्यामुळे मूर्तीचे फक्त मुखकमल दर्शन होत असते. वास्तविक या मूर्तीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे.

आपण सहसा पांडुरंगाची मूर्ती, दोन्ही हात कमरेवर ठेवून उभा असलेला पांडुरंग पाहतो पण या मूर्तीत पांडुरंगाचा डावा हात कमरेवर आहे तर उजवा हात कमरेच्या खाली आहे पण समोरच्या बाजूला उघडणारा तळवा किंवा तळहात दिसतो... म्हणून त्याला विजयी पांडुरंग असे म्हणतात.



हा विजयी पांडुरंग कसा याची एक सुंदर आख्यायिका आहे, हा भगवंत नाथांना प्रासादिक रूपाने मिळालेला आहे, ही मूर्ती दिडफूट उंचीची आणि अडीच किलो वजनाची पंचधातूंपासून बनवलेली मूर्ती आहे. कर्नाटकातील राजा रामदेवराय हा पंढरपूरच्या पांडुरंगाचा उपासक होता. त्यामुळं त्यानं मंदिर बांधलं आणि सोनाराकरवी पंचधातूंची मूर्ती बनवून घेतली आणि त्याची प्राणप्रतिष्ठा करणार तोच पांडुरंग दृष्टांत देऊन त्यांना म्हणाला, माझी ही मूर्ती तू इथे स्थापलीस तर मी इथे राहणार नाही आणि माझ्या इच्छेविरुद्ध तू तसं केलंस तर तुझा निर्वंश होईल ! मग राजाने विचारले की या मूर्तीचे काय करू? तेव्हा पांडुरंग म्हणाला, की पैठणच्या नाथ महाराजांना नेऊन दे...

त्यानंतर राजाने ती मूर्ती वाजत गाजत पैठणला आणली. तेव्हा नाथ महाराज मंदिरात असलेल्या खांबाला टेकून प्रवचन सांगत होते. ते ज्या खांबाला टेकून पुराण सांगायचे त्या खांबाला पुराण खांब असे म्हणतात. राजा रामदेवराय नाथांचे प्रवचन संपेपर्यंत थांबले आणि त्यांनी ही मूर्ती तुमच्याकडे कशी व का आणली हे सर्व नाथांना सांगितले आणि त्यामुळे भगवंतांना तुमच्याकडे ठेवून घ्या असे सांगितले...

त्यावर नाथांनी मूर्तीला नमस्कार केला आणि म्हणाले की, तू राजाच्या घरी राहणारा आहेस, माझ्याकडे तुझी रहायची इच्छा आहे पण राजासारखे पंचपक्वान्न माझ्याकडे तुला मिळणार नाही, तेव्हा या भगवंताच्या पायाखालच्या विटेवर अक्षरं उमटली, दास जेवू घाला न.. घाला, म्हणजे हे नाथ महाराज मी तुझ्याकडे दास म्हणून आलोय. तू जेवायला दे अथवा न दे मी तुझ्याजवळ राहणार आहे . हे ह्या मूर्तीच एक वैशिष्ट्य सांगता येते की विटेवर असूनही ही उमटलेली अक्षरे आहेत.

प्रत्यक्ष भगवंत घरी आले म्हणल्यावर पूर्वी पाहुणचार म्हणून कोणी बाहेरून आले की गुळ पाणी दिले जायचे. पण प्रत्यक्ष भगवंत आलेत म्हणल्यावर त्यांनी आपल्या पत्नीला आवाज दिला. त्यांचे नाव गिरीजाबाई होते. त्यांचा पाहुणचार म्हणून बाईंनी चांदीच्या वाटीत लोणी आणि खडीसाखर आणलं नी नाथांच्या समोर धरलं. हे लोणी घेण्यासाठी म्हणून भगवंतांनी आपला उजवा हात कमरेवरचा काढून पुढे केला नी लोणी चाटले. नंतर तो हात लोणचट म्हणजेच थोडा लोणी लागलेला असल्याने परत कमरेवर ठेवताना हात व्यवस्थित कमरेवर ठेवला नाही म्हणून त्या मूर्तीचा हात असा आहे. आणि या मूर्तीचं दुसरं वैशिष्ट्य असं आहे की आजही प्रत्येक एकादशीला अभिषेकासाठी मूर्ती खाली घेतली जाते तेव्हा संपूर्ण अभिषेकानंतर मूर्तीला पिढीसाखरेने स्वच्छ पुसलं जातं. तेव्हा हाताला ही पुसलं जातं, तेव्हा त्या हातावरून हात फिरवला तर आजही लोण्याचा चिकटपणा जाणवतो.

याच भगवंतांनी नाथांच्या घरी कावडीने पाणी वाहिले. मूर्तीच्या खांद्यावर पाणी वाहिल्याचे गट्टे आजही दिसतात. अशा तीन वैशिष्ट्याने नटलेली ही विजयी पांडुरंगाची मूर्ती आहे...!

।। जयजय श्रीराम श्रीकृष्ण श्रीहरी ।।

# चारामाचे एलियन्स..?

छत्तीसगढ हा दाट जंगलांचा प्रदेश. साधारण साठ हजार चौरस किलोमीटरचे जंगल या राज्यात आहे. म्हणजेच, एकूण राज्याचा ४५% भाग हा जंगलाने व्यापलेला. याच्या जनजातीय बहुल स्वरूपामुळे, सन २००० मध्ये, मध्य प्रदेशातून वेगळं काढून, हे एका राज्याच्या स्वरूपात उभं राहिलं. घनदाट जंगलांमुळे या राज्याच्या काही भागात नक्षलवादी चळवळ काही प्रमाणात अजूनही तग धरून आहे, पण ती दिवसेन् दिवस क्षीण होत चालली आहे.

अश्या ह्या छत्तीसगढ राज्यात, कांकेर नावाचा जिल्हा आहे. पूर्वी तो बस्तर जिल्ह्याचाच एक भाग होता. नंतर मात्र बस्तरच्या उत्तर भागाला वेगळं करून कांकेर हा जिल्हा निर्माण करण्यात आला. या कांकेर मध्ये, 'चारामा' हे तालुक्याचे ठिकाण आहे. राष्ट्रीय महामार्ग ३० वर वसलेलं, लहानसं गाव. गावाच्या दुसऱ्या बाजूने महानदी वाहते. जंगल आणि पर्वतांनी या लहानश्या गावाला अत्यंत निसर्गसमृद्ध केलेलं आहे.

तर अश्या ह्या चारामा तालुक्यातल्या चंदेली, गोटिटोला, गाडागौरी या गावांजवळील पहाडांमध्ये, गावकऱ्यांना काही शैलचित्रं आढळली. शैलचित्र म्हणजे पहाडांमधल्या गुहांमधून काढलेली चित्रं. अजंताचं उदाहरण या संदर्भात देता येईल. पण ती चित्रं खूप नंतरची. आणि ती खोदून काढलेल्या गुफांमध्ये काढलेली. शैलचित्र ही निसर्गनिर्मित गुफांमध्ये काढलेली असतात. कांकेर मधल्या चारामा या तालुक्यातील गावांमध्ये गुफांमधून जी चित्रं सापडली, ती दहा हजार वर्षे जुनी आहेत. गंमत म्हणजे, ही चित्रं काळ्या, पिवळ्या, लाल आणि नारंगी रंगात काढलेली आहेत. इतकी हजार वर्षे उलटून गेल्यानंतरही या चित्रांवरचे रंग फारसे फिकट झालेले नाहीत, हे महत्त्वाचं.

ही शैलचित्रं आढळली, ती सन २०१४ मध्ये. यात गाडागौरी गावातल्या गढशीतला गुहेत, विशेष शिरस्त्राण आणि स्पेस सूट सदृश्य वेश घातलेल्या मानवी आकृत्यांची चित्रं आढळली. चंदेली गावातल्या शीतला मां पहाडामध्येही, विशिष्ट शिरोभूषण घातलेल्या आणि हातात त्रिशूळ घेतलेल्या मानवी आकृत्यांची चित्रं मिळाली. ही चित्रं, पिवळ्या आणि लाल रंगात रंगवलेली आहेत.

मात्र चारामा तालुक्यातल्या गोटिटोला आणि उदकुंड इथे जी चित्रं मिळाली, ती आज आपण जी 'एलियन' (अर्थात, परग्रहावरून आलेल्या व्यक्ती) ची कल्पना करतो, त्याप्रमाणे आहेत. महत्त्वाचं म्हणजे, या गुहेत एका गोलाकार (उडत्या) तबकडीचे चित्र आहे. या तबकडीला, तीन पाय आणि अँटेना सदृश्य पंखांची रचना आहे.

हे चित्र बघून छत्तीसगढ मधील पुरातत्ववेत्ते जे. आर. भगत यांनी ठाम मत मांडलं की ही भित्तीचित्र (शैलचित्र), परग्रहावरून आलेल्या व्यक्तींची (एलियन्सची) आहेत. त्यांना बघून, येथे राहणाऱ्या आपल्या पूर्वजांनी ही चित्र काढली असावीत.

भगत यांच्या या दाव्याने खळबळ उडाली. मीडिया सक्रिय झाला. राष्ट्रीय मीडियाने यात रस घेतला. टीव्ही आणि वर्तमानपत्रात बातम्या येऊ लागल्या. सोशल मीडिया नवीन सुरू झालेलं होतं. त्यातही हा विषय आला. छत्तीसगढ मध्ये परग्रहावरच्या व्यक्ती आल्या होत्या, अशा स्टोरीज सुरू झाल्या.

दरम्यान, छत्तीसगढ सरकारने या भित्ती-चित्रांच्या कार्बन डेटिंगची प्रक्रिया पूर्ण केली. त्यात असं आढळलं की ही भित्तीचित्रं दहा हजार वर्ष प्राचीन आहेत..!

ही फार मोठी बातमी होती. 'दहा हजार वर्षांपूर्वी खरंच परग्रहावरील व्यक्ती या अशा दुर्गम भागात आल्या होत्या का?' हा प्रश्न चर्चेच्या वर्तुळात फिरत राहिला. नंतर काही महिन्यांनी या बातमीचा मागोवा घेत, फ्रान्सचा पुरातत्व संशोधक जीन

क्लोट्स (Jean Clottes) आणि डॉक्टर मीनाक्षी दुबे-पाठक, हे चारामा तालुक्यात आले. त्यांनी वेगवेगळ्या गुफांमधील शैलचित्रं (भित्तीचित्रं) बघितली. त्यांनी मात्र, 'ही चित्रं परग्रहावरच्या व्यक्तींची नाहीत' असं सांगितलं.

अर्थात, अजूनही याचा नीट उलगडा झालेला नाही. छत्तीसगढच्या पुरातत्व विभागाने या संदर्भात अमेरिकेतील नासा आणि भारतातील इसरो ला पत्रं पाठवली. 'ही चित्रं परग्रहावरच्या व्यक्तींची असू शकतात का?' अशी विचारणा केली. मात्र दोन्ही संस्थांनी यावर काहीच उत्तर दिलेलं नाही.

जगभर यु एफ ओ (अनआयडेंटिफाइड फ्लाईंग ऑब्जेक्ट्स) च्या बद्दल आकर्षण असणारे अनेक समूह आहेत. जगभरातल्या या समूहांमध्ये, 'चारामा एलियन्स' या विषयावर अजूनही चर्चा होत असते.

या एलियन प्रकरणात निर्माण झालेल्या सनसनाटीमुळे, छत्तीसगढच्या दुर्गम भागात असलेल्या या शैलचित्रांचा विषय काहीसा मागे पडला. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी, आपल्या पूर्वजांनी गुफांमधल्या भिंतींवर चित्रे काढून ठेवली आहेत. त्यातून बरेचसे संदर्भ मिळू शकतात. म्हणूनच यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

छत्तीसगढमधील शैलचित्रांच्या शोधाचा इतिहास तसा जुना आहे. या दुर्गम भागातील पहाडांमध्ये आणि निसर्गनिर्मित गुफांच्या भिंतींवर, शैलचित्रं आहेत, असा शोध फार आधी लागला आहे. सन १९१० मध्ये, सी. डब्ल्यू. एंडरसन या इंग्रज अधिकाऱ्याने सिंघनपुरच्या गुफांमधील शैलचित्रं शोधून काढली.

सिंघनपुर हे गाव छत्तीसगढच्या रायगढ जिल्ह्यात येते. रायगढपासून २० किलोमीटर पश्चिमेच्या पहाडांमध्ये, या शैलचित्रांच्या गुफा आढळल्या. नंतर जेव्हा कार्बन डेटिंग सारख्या पद्धतीने त्यांचं वय काढण्यात आलं, तेव्हा ही चित्रं तीस हजार वर्ष जुनी निघाली. एंडरसनने शोधलेली ही शैलचित्रं, 'इंडिया पेंटिंग्स' या मासिकाने १९१८ मध्ये छापली होती. एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका च्या १३ व्या अंकात, या चित्रांची माहिती दिलेली आहे. मात्र तेव्हापर्यंत ही चित्रं किती प्राचीन आहेत याची माहिती नव्हती.

एंडरसनच्या नंतरही, १९२३ ते १९२७ या कालखंडात, अमरनाथ दत्त यांनी रायगढ जिल्ह्यातील इतर काही शैलचित्रं शोधून काढली. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या संदर्भात फारसे काम झालेले नाही. नंतर या भागात नक्षलवाद पसरला आणि प्राचीन काळातला हा अनमोल खजिना, काळाच्या पडद्याआड गेला. नक्षलवाद्यांना यातील अनेक शैलचित्रांची आणि शैल आश्रयांची माहिती होती / आहे असं म्हणतात. मात्र त्यांनी ती सार्वजनिक करण्याचा प्रश्नच नव्हता. कारण त्या सर्व नक्षलवाद्यांच्या लपण्याच्या जागा होत्या.

मात्र जसजसा नक्षलवादाचा खात्मा होत चाललाय, तसं तशा शैलचित्रांच्या अनेक जागा समोर येत जातायेत. आत्तापर्यंत ३२ ठिकाणी, अक्षरशः शेकड्यांनी शैलचित्रं मिळालेली आहेत. सध्या नक्षलवाद्यांचं आश्रयस्थान असलेल्या विजापुर, दंतेवाडा, नारायणपुर इत्यादी क्षेत्रांमधून नक्षलवादी बाहेर पडल्यावर, तिथे मोठ्या प्रमाणावर शैलचित्रं सापडतील असा अंदाज आहे.

शैलचित्रांना इंग्रजीत पेट्रोग्लिफ (Petroglyph) म्हणतात. जगभर अनेक ठिकाणी अशी शैलचित्रे सापडली आहेत. या चित्रांवरून, त्या काळच्या मानवी सभ्यतेचा अंदाज लावता येतो, आणि त्यातूनच उत्क्रांतीच्या सिद्धांताची पण तपासणी करता येते. या संदर्भात 'चारामा शैलचित्रं' महत्त्वपूर्ण आहेत.

ऑस्ट्रेलियातल्या वायोमिंग (Wyoming) येथील लिजेंडस् रॉक्स (Legends Rocks) मध्ये, चारामाच्या शैलचित्रांसारखीच, २५० च्या वर शैलीचित्रं मिळालेली आहेत. खरी गंमत तर पुढेच आहे. रायगड पासून ८ किलोमीटर अंतरावर, 'कबरा पहाड' आहे. (छत्तीसगढी भाषेत, 'कबरा' म्हणजे धब्बे किंवा चिट्टे असलेला. आपण म्हणतो ना, 'चितकबरा', तेच.) येथील गुहांमध्ये कांगारू आणि

जिराफ सदृश्य प्राण्यांची शैलचित्रं आहेत. आता कांगारू किंवा जिराफ हे प्राणी आपल्या भरत खंडात असण्याचे काही कारणच नाही. मग दहा हजार वर्षांपूर्वी, ही चित्रं कशाच्या आधारावर काढली गेली असतील..? सारेच अतर्क्य ! या गुफांमध्ये असलेल्या चित्रांचे रंग, इतर ठिकाणच्या शैलचित्रांपेक्षा जास्त गडद आणि स्पष्ट आहेत.

(कोकणात अनेक ठिकाणी 'कातळ चित्रं' बनलेली आहेत. अत्यंत प्राचीन अशी ही चित्रं, उघड्या आकाशाखाली असलेल्या, भल्या मोठ्या एकसंघ कातळांवर कोरलेली आहेत. रत्नागिरीत एकूण १२०० कातळ चित्रं आहेत. आणि गंमत म्हणजे, या कातळ चित्रांत, हत्ती आणि गेंडा या प्राण्यांचा समावेश आहे. हत्ती कोकणात आढळत नाहीत. पण तरीही, कर्नाटकातले हत्ती घाटमाथ्यावरून खाली कोकणात उतरले, असं जरी म्हटलं, तरी गेंड्यांचं काय..? गेंडा हा प्राणी भारतात फक्त पूर्वोत्तर राज्यातच सापडतो. कोकणाशी त्याचा दुरान्वयेही संबंध नाही. मग कोकणातल्या हजारो वर्ष जुन्या अश्या ह्या कातळ चित्रांत, गेंडा कुठून आला..?)

डोंडीलोहारा विकास खंडाच्या सहगांव या गावाजवळ, दल्ली राजहराच्या रस्त्यावर, 'चितवा डोंगरी' हे स्थान आहे. येथे अनेक शैलचित्रं आहेत. या शैलचित्रांत दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. एक म्हणजे यातील काही मानवी आकृत्या ह्या चिनी माणसाच्या वाटतात. यांच्याबरोबरच तेथे ड्रॅगन सारख्या प्राण्यांचीही चित्रं आहेत. तसा कुठलाही प्राणी भारतात आढळत नाही. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, या शैलचित्रांत, काही गूढ भूमितीय आकृत्या आहेत. त्यांचा नेमका अर्थ काय, हे कोणीच, अजून तरी 'डीकोड' करू शकलेलं नाही. काही हजार वर्षांपूर्वी, या अश्या दुर्गम भागात, या शैलचित्रांतून आपल्या पूर्वजांना नेमकं काय सांगायचं असेल..? आजही ते कोडंच आहे.

या भूमितीय आकृत्या फक्त चितवा डोंगरी मध्येच आहेत असं नाही, तर इतरही अनेक शैलाश्रयांमध्ये वेगवेगळ्या रचना दिसतात. उरकुडा गावाच्या जोगी गुफांमध्ये हरणांची जोडी आणि स्त्रियांच्या समूह चित्राबरोबरच, भूमितीय आकृतींचे रेखांकन बघायला मिळते. उरकुडाच्याच ठाकुरपारा मध्ये, मानवी आकृत्यांनी विशिष्ट वेश केलेला दिसतो. येथे आणि इतर अनेक गुफांमध्ये हातांच्या ठशांची चित्रं आहेत.

खैरखेडाच्या चांद पखरा मध्ये, धनुष्यबाण घेतलेला शिकारी मानव, चंद्राकृती पंख पसरलेल्या पक्ष्यांची चित्रं, हातांचे ठसे अशी चित्रं आहेत.

या सर्व स्थानांमध्ये महत्त्वाचं आहे ते गोटिटोला हे गाव. चारामा तालुक्यातल्या या लहानशा गावात, 'सिताराम गुडा' मध्ये, राम कथेवर आधारित शैलचित्रं आहेत.

मुळात चारामा ज्या जिल्ह्यात आहे, तो कांकेर जिल्हा म्हणजेच रामायणातलं दंडकारण्य होतं अशी इथे मान्यता आहे. महानदी शिवाय दूध, हटकुल, सिंदूर आणि तुरु नद्या या जिल्ह्यातून वाहतात. यामुळे हा जिल्हा अत्यंत संपन्न अश्या वनसंपदेने नटलेला जिल्हा आहे. यातील सिताराम गुडा गुफेत, किमान आठ ते दहा हजार वर्ष जुनी असलेली राम कथेतील शैलचित्रं सापडतात. याचा अर्थ काय..? खरंच ती शैलचित्रं रामकथेवर आधारित असलेली असतील, तर रामायणाचा काळ हा निश्चितच दहा हजार वर्षांआधीचा आहे, असं म्हणता येईल. अर्थात यावर बरंच जास्त संशोधन होणं आवश्यक आहे.

छत्तीसगढ मध्ये मोठ्या प्रमाणावर शैल आश्रय सापडताहेत आणि त्याचबरोबर मिळताहेत ती त्या गुफांमधली शैलचित्रं. ही शैलचित्रं, एक गूढ आणि जटील चित्र आपल्या समोर मांडताहेत. त्याचा नेमका अर्थ आपल्याला उमगत नाहीये. मग नक्षलवादी पळवून लावल्यानंतर, छत्तीसगढच्या त्या दुर्गम भागात जी शैलचित्रं सापडतील, त्यांचा अर्थ आपण कसा काय लावणार..?

**– प्रशांत पोळ**

मोबा. ९४२५१५५५५१

(लवकरच प्रकाशित 'भारतीय ज्ञानाचा खजिना – भाग २' चे अंश)



# हृदयस्थ भेट !

साहित्याचे मूल्य समजणारा भेटणे हे अनेकदा अवघडच. पण जर रत्नपारखी भेटला तर मात्र त्या साहित्याचे सोने होते.

असेच एकदा झाले. एकदा एक काव्य पं. हृदयनाथ यांच्या वाचनात आले. ते या रत्नपारखींना एवढे भावले की लगेचच त्यांनी ते स्वरबद्ध केले. खरं म्हणजे शेकडो कविता त्यांच्याकडे पडून होत्या. पण त्या दूर सारून हे गाणे त्यांनी स्वरबद्ध केले.

पं. हृदयनाथ यांचे संगीत आणि गायिकाही तेवढयाच ताकदीच्या. मग काय हे गाणं प्रचंड लोकप्रिय झाले. पण या गडबडीत पं. हृदयनाथ हे गीतकाराची परवानगी घ्यायला मात्र विसरले. हे कवी त्यांचे अपरिचित होते. शिवाय कवी म्हणे राहायलाही दुसऱ्या टोकाला म्हणजे नागपूरला होते.

पं. हृदयनाथांच्या परिचितांनी त्यांना सांगितले की हे कवी खूप तापट आहेत. ते आता तुम्हाला सोडणार नाहीत.. कोर्ट कचेरी करतील म्हणत घाबरवले. या गाण्याला प्रचंड मागणी असल्याने गाणे रोज आकाशवाणीवर गाजत होते.

या अपरिचित तापट कवीच्या कारवाईचा विचार डोक्यातून जात नव्हता. तोच एकदिवस रजिस्टर पोस्टाने एक लिफाफा आला. बहुधा नोटीस आली असेल या मानसिकतेने हृदयनाथांनी स्वीकारला. आणि.. आणि त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

त्या कवींनी नोटीस न देता या गाण्याच्या स्वरसाजाची स्तुती करून आणखी काही गाणी पाठवली होती. एका प्रतिभावंताच्या प्रतिभेला दुसऱ्या प्रतिभावंताने दिलेली तेवढीच उत्स्फुर्त अशी ही दाद !

प्रतिभा ही परमेश्वर देणगी आहे. ती लोकांपर्यन्त पोहोचावी.. श्रेयवाद नको असे मानणारे हे दोघेही प्रतिभावंत ! पुढे हे कवी मंगेशकरांचे स्नेही झाले. या कवींचं नाव आहे सुरेश भट !

मुलीचे लग्न होतेय. पण खरंच वाटत नाहीय.. कसे वाटावे? कालपर्यन्त बोट धरून चालणारी.. दुडूदुडू धावणारी.. सतरादा पडणारी ही कन्या. आजही तशीच हळवी.. लोभस ! मेंदीची पाने इवलीशी.. त्या लहान पानावरही मन झुलतय एवढी ती कोमलहृदयी. जाईच्या फुलांची पाकळी ती केवढी, त्यावरील दवबिंदू सारखे तिचे नाजूक मन.

तिच्या अंगणीचा तोच गार वारा आजही सुखावतोय. तिचा पवित्र तुळशीचा देह हुळहुळतोय. कोवळी काया अशी की हळदीसारखी चमचमतेय. आजही तिच्या डोळ्यांत तेच निष्पाप.. निरागस भाव आहेत...

पं. हृदयनाथ.. लतादीदी आणि सुरेश भट एकमेकांच्या प्रतिभेला दाद देत हृदयस्थ भेट घडविणारे हे अजरामर गाणे..

मेंदीच्या पानावर, मन अजून झूलते गं
जाईच्या पाकळ्यांस, दंव अजून सलते गं

झुळझुळतो अंगणात, तोच गार वारा गं
हुळहुळतो तुळशीचा, अजून देह सारा गं

अजुन तुझे हळदीचे, अंग अंग पिवळे गं
अजुन तुझ्या डोळयांतील, मोठेपण कवळे गं

**गीत : सुरेश भट, संगीत : पं. हृदयनाथ मंगेशकर**

**स्वर : लता मंगेशकर**

(आंतरजालावरून साभार)

# आर्थिक साक्षरता परिसंवाद

**२५ ते ३५ वयोगटातील तरुण मुला-मुलींसाठी तसेच नवदाम्पत्यांसाठी आपल्या दैनंदिन खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ साधत खर्चाचे नियोजन करण्यासाठी आर्थिक साक्षरता परिसंवाद नुकताच कोल्हापूर चित्पावन संघात आयोजित करण्यात आलेला होता. प्रसिद्ध चार्टर्ड अकौंटंट श्री. गौतम नाईक यांनी याप्रसंगी उपस्थितांना आर्थिक साक्षरतेविषयक मार्गदर्शन केले. या मेळाव्याला तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाची क्षणचित्रे**














# चित्पावन संघाच्या मराठी दिनदर्शिकेचे प्रकाशन

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मराठी कालगणनेनुसार दिनदर्शिका चित्पावन संघातर्फे प्रकाशित करण्यात येणार असून तिचे प्रकाशन रविवार दिनांक ३० मार्च रोजी गुढीपाडव्या दिवशी संघ कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी कार्यालयात येऊन सदर दिनदर्शिका घेऊन जावी ही विनंती.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.